0001

## नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

**वाचा :-**

१) या कार्यालयाचे दक्षता शाखेकडून दिनांक २५/०७/२०१२ रोजी प्राप्त झालेला अहवाल व त्यासोबतची कागदपत्रे.

२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.४९/२०१२/जा.५०४, दिनांक २५/०७/२०१२ व ०७/०८/२०१२.

३) सहाय्यक पोलिस निरिक्षक तथा तपासी पोलिस अधिकारी, एपीएमसी पोलिस ठाणे, नवी मुंबई यांचे दिनांक ३१/०७/२०१२ रोजीचे अभिवेदन.

४) मे. हंसराज खिमराज ॲण्ड कंपनीचे मालक मुकेश करमसिंग देठीया यांचे दि. ३१/०७/२०१२ रोजीचे निवेदन.

५) या कार्यालयाची पत्र" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.४९/२०१२/जा.५५७, दि. १३/०८/२०१२.

६) सहाय्यक पोलिस निरिक्षक तथा तपासी पोलिस अधिकारी, एपीएमसी पोलिस ठाणे, नवी मुंबई यांचे दिनांक २१/०८/२०१२ रोजीचे अभिवेदन.

७) मे. हंसराज खिमराज ॲण्ड कंपनी, मे. जरना ट्रेडिंग, मे. बॉम्बे सप्लायर्स, मे. जलाराम राईस ट्रेडर्स, मे. सिमोसिस इन्टरनॅशनल, मे. ताज अग्रो कमोडिटीज प्रा.लि. व मे. संघार एक्सपोर्टस् यांचे दिनांक २१/०८/२०१२ रोजीचे स्वतंत्र लेखी निवेदने.

८) उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांचा दिनांक २३/०८/२०१२ रोजी प्राप्त अहवाल.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
HEAD OFFICE
MUMBAI

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.४९/२०१२/जा. ८०७
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इंशुरंस इमारत, ५ वा मजला,
१४, ज.टाटा मार्ग, चर्चगेट,
मुंबई - ४०० ०२०.
दिनांक :२७/०८/२०१२.

## आ दे श

(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)

**प्रकरणाची पार्श्वभूमी :-**

दिनांक २१/०७/२०१२ रोजी या कार्यालयास मिळालेल्या खात्रीलायक खबरीनुसार या कार्यालयातील फिरत्या पथकातील अधिकारी/कर्मचारी पंचांसह मे. हंसराज खिमराज ॲण्ड कंपनी, प्लॉट क्र. १७ व १८, सेक्टर १९ अे, वाशी, नवी मुंबई येथील गोदामात गेटमधून आत प्रवेश केला असता आतमध्ये काही कामगार अन्नधान्य सफाई करीत असल्याचे दिसून आले. त्या ठिकाणी काम करणाऱ्या कामगारास पंचासमक्ष अधिकाऱ्यांनी कंपनीचे काम

कोण पाहतो, मालक कोण आहेत अशी विचारणा केली असता, त्यांनी बाजूला असलेल्या प्लॉट क्र. १७ येथे भरत भानुशाली बसतात ते कंपनीचे मॅनेजर असून ते संपूर्ण माहिती सांगून त्यांचेकडे जाण्याची विनंती केली. अधिकारी पंचांसमवेत बाजूच्या प्लॉट क्र. १७ येथे आले असता, गेट समोर डाव्याबाजूस असलेल्या टेबलावर एक इसम बसल्याचे दिसले. अधिकाऱ्यांनी त्याला त्यास नांव विचारले असता, त्याने त्याचे नांव रमेश हंसराज गोरी असे असल्याचे सांगून तो गोदामकिपर म्हणून काम करीत असल्याचे सांगितले. अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष प्लॉट क्र. १७ व १८ मध्ये साठवणूक केलेल्या अन्नधान्य व कडधान्य संबंधी विचारणा केली असता, त्यांनी सदर अन्नधान्य व कडधान्य वेगवेगळ्या पार्टीचे असून ते या ठिकाणी सफाई करिता पाठवितात, असे सांगितले. अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष अन्नधान्य व कडधान्याचे साठवणूकी संबंधीचे आवश्यक असलेले परवाने आहेत का ? अशी विचारणा केली असता, असे कोणतेही परवाने उपलब्ध नसल्याचे सांगितले. त्यांनी त्याला जास्त काही माहित नसून तो आवक जावक नोंदी घेणे, गाडी आल्यास खाली करणे, लोडिंग करणे असे कामे करत असल्याचे सांगितले.

अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष मॅनेजर कुठे आहेत, अशी विचारणा रमेश गोरी यांचेकडे केली असता, त्यांनी ते वर पोटमाळ्यावर कार्यालयात बसतात असे सांगून त्यांना खाली बोलावून आणतो असे सांगून ते एका इसमास सोबत खाली घेऊन आले. सदर इसमास अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष त्याचे नांव व पद विचारले असता, त्याने त्याचे नांव भरत विरजी भानुशाली असल्याचे सांगून मे. हंसराज खिमराज ॲण्ड कंपनीमध्ये मॅनेजर म्हणून काम पाहत असून, मागील १८ वर्षापासून या कंपनीत काम करत असल्याचे सांगितले. त्याचप्रमाणे अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष महाराष्ट्र अनुसुचित वस्तू घाऊक व्यापार अनुज्ञप्ती आदेश १९९८ अन्वये अन्नधान्य, कडधान्य खरेदी/विक्री/साठवणूकीसंबंधी आवश्यक असलेल्या परवान्याबाबत विचारणा केली असता, असा परवाना नाही. परंतू सन २००८ मध्ये परवाना मिळण्यासाठी अर्ज केला होता. त्याची छायाप्रत उपलब्ध असल्याचे सांगून छायाप्रत सादर केली.

अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष कंपनीचे मॅनेजर भरत भानुशाली यांना कंपनीच्या कामकाजासंबंधी माहिती विचारली असता, त्यांनी वेगवेगळ्या पार्ट्यांकडून माल येतो. त्याची सफाई ठरावीक रक्कम घेऊन करुन दिली जाते असे सांगितले. अधिकाऱ्यांनी पुन्हा सफाई करण्यासाठी घेण्यात येणाऱ्या मोबदल्याबाबत विचारणा केली असता, गहू, तांदूळ प्रति किलो ५५ पैसे व कडधान्य प्रति किलो ७० पैसे घेतले जात असल्याचे सांगितले. अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष प्लॉट क्र. १७ व १८ मधील अन्नधान्य व कडधान्याच्या साठा संबंधीचे बिले विचारले असता, त्यांनी संबंधित पार्टीकडे अन्नधान्य, कडधान्य खरेदी केल्याचे बिले असतात, त्यांच्याकडे व्यापाऱ्यांनी पाठविलेल्या पत्रानुसार

आवक नोंद आवक बुकामध्ये व जावक नोंद जावक बुकामध्ये तीन प्रतीमध्ये घेतली जातात. एक प्रत पार्टीस दिली जाते व एक प्रत ऑफिसमध्ये देण्यात येते आणि एक प्रत सदर बुकामध्ये असते, असे सांगितले.

अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष प्रत्यक्ष साठ्यासंबंधी विचारणा केली असता, रमेश गोरी गोदामकिपर यांनी प्लॉट क्र. १७ व १८ येथील साठा प्रत्यक्ष मोजमाप करुन सांगतो, असे सांगून, त्यांनी मोजदाद करुन खालील नमूद केल्याप्रमाणे अन्नधान्य, कडधान्याचा साठा सांगितला.

| अ. क्र. | व्यापाऱ्यांचे नांव | धान्याचे प्रकार | बाचके/बॅग | वजन किलो | अंदाजे किंमत |
|---|---|---|---|---|---|
| १ | जरना ट्रेडिंग | तांदूळ | ६५९ | १६४७५ | १,९७,७००/- |
| २ | जरना ट्रेडिंग | तांदूळ | २६६ | ५३०० | ६३,६००/- |
| ३ | बॉम्बे सप्लायर्स | तांदूळ | ६० | १५०० | १८,०००/- |
| ४ | जलाराम राईस ट्रेडर्स | तांदूळ | ३२२ | ८०५० | ९६,६००/- |
| ५ | सिमोथिस इन्टर. | करडी | २६४ | ७९२० | ३,१६,८००/- |
| ६ | ताज अग्रो | वटाणा | ४३ | २१५० | ४७,३००/- |
| ७ | ताज अग्रो | वटाणा | १७ | ६२५ | १३,७५०/- |
| ८ | ताज अग्रो | वटाणा दाळ | ११ | ५५० | ६,६००/- |
| ९ | संगार एक्सपोर्ट | चणा | ६०६ | १५१५० | ६,९६,९००/- |
| १० | प्रेमचंद केशवजी | गहू | २३९ | ७१७० | ८६,०४०/- |
| ११ | जिगर मोहम/किरण ट्रेडिंग सुब एन्टरप्राईसेस | गहू | १६४ | ४९२० | ५९,०४०/- |
| १२ | जिगर मोहम/किरण ट्रेडिंग सुब एन्टरप्राईसेस | गहू | ७१७ | ३५८५० | ४,३०,२००/- |
| १३ | चामुंडा ट्रेडिंग | गहू | ७०१ | ३५०५० | ४,२०,६००/- |
| १४ | सिध्दिविनायक | गहू | ८४६ | ४२३०० | ५,०७,६००/- |
| १५ | अमी ट्रेडर्स | गहू | १८० | ५४०० | ६४,८००/- |
| १६ | लोढया ब्रदर्स | ज्वारी | १४६० | ७३००० | १०,२२,०००/- |
| १७ | लोढया ब्रदर्स | बाजरी | २०२४ | ५०६०० | ७,७८,४००/- |
| १८ | अमर इंटरप्रायईसेस | काश्या | ६४० | ३२००० | ८,००,०००/- |
| १९ | निलाद्री एक्सपोर्ट | काश्या | ४० | १२०० | ३०,०००/- |
| | | | एकूण | ३४५२१० | ५६,५५,१३०/- |

उपरोक्त नमूद साठ्याची मोजदाद करीत असताना भारतीय खाद्य निगम असा शिक्का असलेल्या गोण्या मोठ्या प्रमाणावर साठवणूक केल्याचे आढळून आले. याबाबत पथकाने उपस्थित इसमास विचारणा केली असता, सदरचा गव्हाचा साठा हा संबंधित साठा मालकांनी भारतीय खाद्य निगमच्या गोदामातून खुल्या बाजारांच्या दराने

DIRECTOR OF CIVIL SUPPLIES OFFICE

खरेदी केल्याचे सांगून सदर साठ्याचे खरेदी संबंधीचे सर्व दस्तऐवज साठा मालकांकडे असल्याचे सांगितले. सबब, उपरोक्त नमूद गव्हाचा साठा हा प्रथमदर्शनी शासन नियंत्रित दराचा असल्याबाबत पथकास साशंकता वाटल्याने तसेच उर्वरित अन्नधान्य/कडधान्याचा साठा हा विनाखरेदी बिलांचा तसेच विनापरवाना असल्याचे सकृतदर्शनी दिसून आले.

अधिकाऱ्यांनी पंचामसक्ष प्लॉट क्र. १७ चे गेट व प्लॉट क्र. १८ चे तीन गेट सिलबंद करण्यात आले व सदरहू चारही गेटच्या चाव्या व आरोपी पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष आवक नोंदबुक, जावक नोंदबुक, साठापुस्तक अधिकाऱ्यांनी ताब्यात घेतले. तसेच जप्त मुद्देमालाच्या खरेदी बिलांबाबत भरत भानुशाली (मॅनेजर) यांचेकडे चौकशी केली असता, या ठिकाणी उपलब्ध नसल्याचे सांगितले.

अशाप्रकारे मे. हंसराज खिमराज ॲण्ड कंपनीचे मालक मुकेश करमसिंग देठिया व मॅनेजर रमेश हंसराज गोरी यांनी विनापरवाना तांदूळ व कडधान्य या जीवनावश्यक वस्तूंची साठेबाजी केल्याचे तपासणीमध्ये निष्पन्न झाल्याने, पर्यायाने त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याचे सिध्द होत असल्याने संबंधितांविरुध्द जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३, ७, ८, ९ व १० व महाराष्ट्र अनुसुचित वस्तू घाऊक व्यापार अनुज्ञप्ती आदेश १९९८ च्या तरतुदींचा भंग केल्यावरुन संबंधितांविरुध्द ए.पी.एम.सी. पोलिस ठाणे, नवी मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. ३०६०/२०१२ दिनांक २२/०७/२०१२ अन्वये गुन्हा नोंद करुन वरील मुद्देमाल जप्त करण्यात आला.

उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ प्रमाणे विल्हेवाट लावण्याची विनंती उपनियंत्रक शिधावाटप (अंमल), मुंबई यांनी वाचावे क्र. १ अन्वये केलेली असून जीवनावश्यक वस्तुंमधील डाळी/कडधान्य या अनुसूचीत वस्तूंचा साठेबाजीच्या उद्देशाने साठवणूक केलेला विनापरवाना साठा शासनजमा का करण्यात येवू नये ? याबाबत वाचावे क्र. २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे सर्व संबंधितांना कारणे दाखवा नोटीस बजावून त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देण्यात आली असून त्याकरीता या कार्यालयात दिनांक ३१/०७/२०१२ रोजी सुनावणी ठेवण्यात आली.

दिनांक ३१/०७/२०१२ रोजीच्या सुनावणीस एपीएमसी पोलिस ठाणे येथील तपासी पोलिस अधिकारी तथा सहाय्यक पोलिस निरिक्षक श्री. ए.एन. काटकर हे उपस्थित राहिले व त्यांनी वाचावे क्र. ३ अन्वये लेखी अभिवेदन सादर केले. तसेच सदर सुनावणीस मे. हंसराज खिमराज ॲण्ड कंपनीचे मालक मुकेश करमसिंग देढीया, मॅनेजर भरत विरजी भानुशाली व गोदामकिपर रमेश हंसराज गोरी हे उपस्थित राहिले. मे. हंसराज खिमराज ॲण्ड कंपनीचे मालक मुकेश करमसिंग देढीया यांनी वाचावे क्र. ४ अन्वये लेखी निवेदन सादर केले व सदर साठ्याच्या साठवणूकीकरिता त्यांचेकडे परवाना नसल्याचे सांगितले. तसेच सदरचा जप्त साठा हा इतर व्यावसायीक यांचा असल्याचे सांगून त्या अनुषंगाने विविध आस्थापनांसोबत साठवणूकीकरिता करारनामा नसल्याचे सांगितले. जप्त

साठ्याबाबत त्यांना अधिक विचारणा केली असता ते अनभिज्ञ असल्याचे सांगून साठा मालक याबाबतची माहिती व साठा संबंधीचे पुरावादर्शक कागदपत्रे सादर करु शकतील असे सांगितले. सबब, मे. हंसराज खिमराज ॲण्ड कंपनीचे मालक तसेच नमूद गोदामातील जप्त साठ्याचे मालकांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी पुढील सुनावणी दिनांक २१/०८/२०१२ रोजी ठेवण्यात आली. 005

दिनांक ३१/०७/२०१२ रोजी मे. हंसराज खिमराज ॲण्ड कंपनीचे मालक मुकेश करमसिंग देढीया यांनी या कार्यालयात ठेवण्यात आलेल्या सुनावणीचे वेळी सदर गुन्हयात जप्त करण्यात आलेला परंतु अनुसुचित वस्तूंच्या यादीत समाविष्ठ नसलेला साठा हा साठा मालकास परत करण्याची विनंती केल्याने नमूद वेअरहाऊसमधील अनुसुचित वस्तूंव्यतिरिक्त जप्त असलेला गव्हाचा १३०६.९० क्विंटल, ज्वारीचा ७३०.०० क्विंटल, बाजरी ५०६.० क्विंटल व काश्या ३३२.०० क्विंटल साठा हा खराब होऊ नये म्हणून त्यांच्या साठा मालकास तात्काळ परत करण्याचे तसेच उर्वरीत अन्नधान्य व कडधान्यांचा जप्त करण्यात आलेला साठा हा पुढील आदेशापर्यंत जैसे थे स्थितीत जतन करण्याबाबत या कार्यालयाचे वाचावे क्र. ५ अन्वये पत्र निर्गमित करण्यात आले.

दिनांक २१/०८/२०१२ रोजीच्या सुनावणीस एपीएमसी पोलिस ठाणे येथील तपासी पोलिस अधिकारी तथा सहाय्यक पोलिस निरिक्षक श्री. ए.एन. काटकर हे उपस्थित राहिले व त्यांनी वाचावे क्र. ६ अन्वये लेखी अभिवेदन सादर केले. तसेच सदर सुनावणीस मे. हंसराज खिमराज ॲण्ड कंपनीचे मालक मुकेश करमसिंग देढीया, मे. जरना ट्रेडिंगचे मालक प्रविण जी. मानक, मे. बॉम्बे सप्लायर्स या कंपनीचे व्यवस्थापक किशोर जेठालाल शाह, मे. जलाराम राईस ट्रेडर्सचे मालक दयालजी कल्याणजी भानुशाली यांच्या वतीने त्यांचा मुलगा निमेश दयालजी भानुशाली, मे. सिमोसिस इन्टरनॅशनलचे भागीदार अंकुश अरुण अग्रवाल, मे. ताज अग्रो कमोडिटीज प्रा.लि. चे संचालक हिम्मत जमुनादास चंद्रा व मे. संघार एक्सपोर्टस् या कंपनीच्या वतीने व्यवस्थापक वैभव विजय किर्पेकर यांनी उपस्थित राहून वाचावे क्र. ७ अन्वये स्वतंत्र लेखी निवेदने सादर केले.

सबब, प्रकरण गुणवत्तेवर निर्णयास्तव राखीव ठेवण्यात आले.

DIRECTOR OF CIVIL SUPPLIES OFFICE BAI

**<u>युक्तिवाद</u> :-**

दिनांक ३१/०७/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित एपीएमसी पोलिस ठाणे येथील तपासी पोलिस अधिकारी तथा सहाय्यक पोलिस निरिक्षक श्री. ए.एन. काटकर यांनी युक्तीवाद केला की, एकंदरीत झालेल्या तपासावरुन यातील अटक आरोपी यांनी आपसात संगणमत करुन त्यांचे मे. हंसराज खिमराज ॲण्ड कंपनीमध्ये ५६,५५,९३०/- रुपये किंमतीचा अन्नधान्य व कडधान्याचा साठा शिधावाटप आस्थापनेचा घाउक संयुक्त परवाना (पीडीएल/एफडीएल) नसताना बेकायदेशिररित्या साठवणूक केला असल्याचे निष्पन्न होत आहे. तसेच ते सदर

कंपनीत साफसफाई करण्यासाठी व्यापाऱ्याकडून आलेला माल साफ करुन देत असतात. यातील अटक आरोपी यांचे मे. हंसराज खिमराज ॲण्ड कंपनीमध्ये मिळून आलेला अन्नधान्य/कडधान्याचा साठा हा व्यापाऱ्यांचा असून त्यांनी त्यांचे मालाच्या खरेदी पावत्या तसेच सदर कंपनीमध्ये माल ठेवलेबाबतची मे. हंसराज खिमराज ॲण्ड कंपनीच्या पावत्या सादर केलेल्या असून त्यांचेकडे शिधावाटप आस्थपनेचा घाउक संयुक्त परवाना (पीडीएल/एफडीएल) व इतर परवाने असून त्यांच्या छायांकित प्रती सादर केलेल्या आहेत. सदर गुन्ह्यात जप्त करण्यात आलेला अन्नधान्य/कडधान्याचा साठा हा वर नमुद व्यापाऱ्यांचा असून त्यांचा सदरचा साठा यातील अटक आरोपी यांनी शिधावाटप आस्थापनेचा घाउक संयुक्त परवाना (पीडीएल/एफडीएल) नसताना बेकायदेशिररित्या साठवणूक केला असल्याचे निष्पन्न झाले असल्याने नमूद धान्याच्या साठ्याबाबत योग्य तो आदेश होणेस विनंती आहे, असे सांगून तसे लेखी अभिवेदन सादर केले.

दिनांक ३१/०७/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. हंसराज खिमराज ॲण्ड कंपनीचे मालक मुकेश करमसिंग देढीया यांनी युक्तीवाद केला की, साठा मालकांची यादी सोबत जोडण्यात आली असून त्यांच्या गोदामातील साठ्यापैकी तांदळाचा साठा हा नगन्य परिमाणात आहे. तसेच काबुली चणा हा निर्यातीकरिता व हिरवे वटाणा हा आयात असल्याचे सांगून त्यांचे गोदाम सिलमुक्त करण्यात यावे. जेणेकरुन सदरचा नाशवंत असलेला साठा खराब होणार नाही, असे सांगून तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक २१/०८/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित एपीएमसी पोलिस ठाणे येथील तपासी पोलिस अधिकारी तथा सहाय्यक पोलिस निरिक्षक श्री. एन.एन. काटकर यांनी युक्तीवाद केला की, मे. हंसराज खिमराज ॲण्ड कंपनी सोबत साठा मालकांचा साठवणूक करुन ठेवण्याबाबतचा कोणताही करारनामा झालेला नाही. सदर गुन्हयात जप्त करण्यात आलेल्या परंतू अनुसुचित वस्तूंच्या यादीत समाविष्ठ नसलेल्या गहू, ज्वारी, बाजरी व काश्याचा साठा हा मे. शाह प्रेमचंद केशवजी ॲण्ड कंपनी, मे. अमी ट्रेडर्स, मे. चामुंडा ट्रेडिंग, मे. सिध्दीविनायक कॉर्पोरेशन, मे. जिगर मोहनलाल ॲण्ड कंपनी, मे. किरण एंटरप्राईस, मे. शुभ एंटरप्राईस, मे. हंसराज वसंतजी ॲण्ड सन्स, मे. लोढाया ब्रदर्स, मे. अमर इंटरनॅशनल व मे. निलाद्री एक्सपोर्ट या साठा मालकांना आपण केलेल्या आदेशानुसार त्यांचा साठा खराब होऊ नये म्हणून सदर मालाचे कागदपत्राची खातरजमा करुन तो त्यांच्या साठा मालकांस परत करण्यात आला असून या व्यतिरिक्त गोदामातील इतर अनुसुचित वस्तूंचा साठा हा सुरक्षित ठेवण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात जप्त करण्यात आलेला अन्नधान्य/कडधान्याचा साठा हा नमुद व्यापाऱ्यांचा असून त्यांचा सदरचा साठा यातील अटक आरोपी यांनी शिधावाटप आस्थापनेचा घाउक संयुक्त परवाना (पीडीएल/एफडीएल) नसताना बेकायदेशिररित्या साठवणूक केला असल्याचे निष्पन्न झाले असल्याने नमूद धान्याच्या साठ्याबाबत योग्य तो आदेश होणेस विनंती आहे, असे सांगून तसे लेखी अभिवेदन सादर केले.

दिनांक २१/०८/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. हंसराज खिमराज ॲण्ड कंपनीचे मालक मुकेश करमसिंग देढीया यांनी युक्तीवाद केला की, त्यांच्या गोदामातील अनुसुचित वस्तूंच्या यादीत समाविष्ठ नसलेला साठा मुक्त केल्याबाबत आभार मानून त्यांनी त्यांच्या गोदामात होणाऱ्या क्लिनिंग व प्रोसेसिंगच्या प्रक्रियेकरिता परवानगी देण्यात यावी. तसेच पोलिस स्टेशनमधील दाखल केलेला गुन्हा हा परत घेऊन साठा मुक्त करण्याची विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक २१/०८/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. जरना ट्रेडिंगचे मालक प्रविण जी. मानक यांनी युक्तीवाद केला की, त्यांचा नमूद गोदामात तांदळाचा २१७७६ किलो ग्रॅम साठा जप्त असून सदरचा साठा हा साफसफाईच्या प्रक्रियेसाठी हंसराज खिमराज यांच्या गोदामात पाठविण्यात आल्याचे सांगून त्यांच्याकडील विविध परवानांच्या तसेच साठ्याची खरेदी बिले सादर केली असल्याने त्यांचा जप्त करण्यात आलेला साठा मुक्त करण्याची विनंती करुन यापुढे सादर केलेल्या माहिती व्यतिरिक्त इतर माहिती आवश्यक असल्यास ती सादर करण्यात येईल, असे सांगून तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक २१/०८/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. बॉम्बे सप्लायर्स या कंपनीचे व्यवस्थापक किशोर जेठालाल शाह यांनी सादर केलेल्या कंपनीच्या निवेदनात, त्यांचा नमूद गोदामात तांदळाचा १५०० किलो ग्रॅम साठा जप्त असून सदरचा साठा हा साफसफाईच्या प्रक्रियेसाठी हंसराज खिमराज यांच्या गोदामात पाठविण्यात आल्याचे सांगून त्यांच्याकडील विविध परवानांच्या तसेच साठ्याची खरेदी बिले सादर केली असल्याने त्यांचा जप्त करण्यात आलेला साठा मुक्त करण्याची विनंती करुन यापुढे सादर केलेल्या माहिती व्यतिरिक्त इतर माहिती आवश्यक असल्यास ती सादर करण्यात येईल, असे नमूद केले आहे.

दिनांक २१/०८/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. जलाराम राईस ट्रेडर्सचे मालक दयालजी कल्याणजी भानुशाली यांच्या वतीने त्यांचा मुलगा निमेश दयालजी भानुशाली यांनी मालकाच्या सादर केलेल्या निवेदनात, त्यांनी ३२२ बाचके तांदळाचा साठा हा हंसराज खिमराज मिल या ठिकाणी साठवणूकीकरिता पाठविलेला नसून तो सफाईकरिता पाठविला असून सदरचा साठा हा किरकोळ मर्यादेमध्ये असल्याचे नमूद केले आहे. सदरचा साठा हा नाशवंत असल्याने व सफाईसाठी पाठविला असल्याने तो मुक्त करण्याची विनंती केली.

दिनांक २१/०८/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. सिमोसिस इन्टरनॅशनलचे भागीदार अंकुश अरुण अग्रवाल यांनी युक्तीवाद केला की, त्यांची कंपनी ही शासनमान्यता असलेली निर्यात कंपनी असून ते सदरचा साठा हा पक्षी खाद्य उद्योग असलेल्या कंपन्यांना पुरवठा करीत असून त्यांचा विशेष करुन पक्षी व पशु यांच्या खाद्यासाठी उपयोग केला जातो. त्यांनी निर्यातकरिता आवश्यक असलेले संबंधित प्रमाणपत्र निवेदनासोबत जोडले आहे. सदर

INSPECTOR ... CIVIL SUPPLIES ... OFFICE

साठा हा सफाई झाल्यानंतर तात्काळ निर्यात करावयाचा असल्याने मुक्त करण्याची विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक २१/०८/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. ताज अग्रो कमोडिटीज प्रा.लि. चे संचालक हिम्मत जमुनादास चंद्रा युक्तीवाद केला की, त्यांचा ५० किलो क्षमतेच्या ७६ बाचक्यांमध्ये ३.८ मे. टन, ३० किलो क्षमतेच्या १७ बाचक्यांमधील ०.५१ मे. टन वाटाणाचा साठा तसेच ५० किलो क्षमतेच्या ११ बाचक्यांमधील ०.५५ मे. टन वाटाणादालचा साठा हा हंसराज खिमजी मिल येथे सफाईसाठी पाठविला असून त्यांना तो परत मिळाल्यानंतर तात्काळ वितरीत करावयाचा असल्याने तसेच सदर साठा हा आयात असून त्या संबंधी बिल ऑफ एन्ट्री आपल्या कार्यालयात सादर केले असल्याने सदरचा साठा मुक्त करण्याची विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक २१/०८/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. संघार एक्सपोर्टस कंपनीच्या वतीने व्यवस्थापक वैभव विजय किर्पेकर यांनी युक्तीवाद केला की, त्यांचा ६०६ बाचक्यांमधील १५.१७५ मे. टन काबुली चण्याचा साठा हा हंसराज खिमती दालमिल येथे जप्त करण्यात आला आहे. सदर काबुली चण्याच्या साठ्याचे ते नियमितपणे निर्यात करीत असून तो गुंतूर जिल्ह्यातील विविध पुरवठादारांकडून सफाई न केलेल्या स्थितीत घेतला असल्याचे सांगून त्या साठ्यापैकीच जप्त असलेला साठा हा निर्यात करावयाचा असल्याने तो सफाईकरिता हंसराज खिमजी मिल येथे पाठविण्यात आले असून जेणेकरुन त्यामधील कचरा व इतर कडधान्यांची सफाई करुन परदेशी खरेदीदारास निर्यात करावयाचा आहे. सदरचा साठा हा दिनांक १८/०७/२०१२ रोजीच्या विक्रि करार क्रमांक एसई/एजीएच/००१ अन्वये अब्दुल गफार हाजी नुर मोहम्मद, कराची, पाकिस्थान यांना पाठवायचा असून त्या संबंधात आवश्यक कागदपत्रे व इतर प्रमाणपत्रे जोडण्यात आली असून जप्त करण्यात आलेला साठा मुक्त करण्याची विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांनी सादर केलेल्या अहवालात, जप्त साठ्याचे साठामालकांकडे महाराष्ट्र शेडयुल्ड कमोडीटीज होलसेल डिलर्स लायसंसिंग ऑर्डर, १९९८ अन्वये अन्नधान्य/कडधान्याच्या घाऊक व्यापाराकरिता आवश्यक असलेल्या परवाना साठा मालकांनी धारण केला आहे किंवा कसे ? असल्यास त्याचे तपशिल, परवानाधारकाचा पत्ता, परवानावरील वेगळे गोदाम नमूद आहे किंवा कसे ? असल्यास त्याचा तपशिल व नसल्यास जप्त करण्यात आलेल्या गोदामात साठा मालकांनी साठवणूक केल्याबाबतचे सुचनापत्र दिले आहे किंवा कसे ? तसेच परवाना असल्यास त्याची वैधता याबाबतचा साठामालक निहाय परिपूर्ण अहवाल सादर केला आहे.

निष्कर्ष :-

प्रस्तुत प्रकरणातील अपचारी यांचा युक्तिवाद, निवेदन, पोलिसांचे अभिवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी खालील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

प्रस्तूत प्रकरणी, दिनांक २१/०७/२०१२ रोजी या कार्यालयातील फिरत्या पथकातील अधिकारी/कर्मचारी पंचांसह मे. हंसराज खिमराज ॲण्ड कंपनी, प्लॉट क्र. १७ व १८, सेक्टर १९ अे, वाशी, नवी मुंबई या ठिकाणी टाकण्यात आलेल्या धाडीत विविध अन्नधान्य व कडधान्यांचा साठा हा विनापरवाना तसेच साठवणूकीच्या आवश्यक कागदपत्र व परवान्याशिवाय आढळून आल्याने अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष जप्त करुन संबंधितांविरुध्द जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३, ७, ८, ९ व १० व महाराष्ट्र अनुसुचित वस्तू घाऊक व्यापार अनुज्ञप्ती आदेश १९९८ च्या तरतुदींचा भंग केल्यावरुन ए.पी.एम.सी. पोलिस ठाणे, नवी मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. ३०६०/२०१२ दिनांक २२/०७/२०१२ अन्वये गुन्हा नोंद करुन वरील मुद्देमाल जप्त करण्यात आला.

केंद्र शासनाची अधिसुचना क्र. एस.ओ.२२२७ (अ), दिनांक २७ सप्टेंबर, २०११ अन्वये डाळी/कडधान्य, खाद्यतेल व खाद्यतेलबिया या अनुसुचित वस्तूंवर दिनांक ३०/०९/२०१२ पर्यंत निर्बंध आहेत. तसेच केंद्र शासनाची अधिसुचना क्र. एस.ओ.२७१६ (अ), दिनांक २९ नोव्हेंबर, २०११ अन्वये तांदुळ या अनुसुचित वस्तूवर दिनांक ३०/११/२०१२ पर्यंत निर्बंध आहेत.

शासन परिपत्रक क्र. ईसीए-१००८/६२२/प्र.क्र.२८४/ना.पु.२३ दिनांक ९ मे, २००८ अन्वये शासनाने लागु केलेल्या साठामर्यादेच्या अनुषंगाने करावयाच्या कार्यवाही संदर्भातील मार्गदर्शक सुचनांमध्ये केंद्रशासनाने डाळी, तांदुळ, खाद्यतेल व खाद्यतेलबिया यांच्या साठयावर निर्बंध आणलेले आहेत त्यामुळे या वस्तुंचा व्यापार करण्यासाठी घाऊक अथवा किरकोळ परवाना घेणे आवश्यक आहे. डाळी, तांदुळ, खाद्यतेल व खाद्यतेलबिया यांच्या साठामर्यादेबाबत लागु केलेले निर्बंध हे हया वस्तु आयात केल्यास त्यावर लागु राहणार नाहीत. तसेच आयात वस्तुंचा व्यापार करण्यासही प्रतीबंध राहणार नाही. मात्र त्या व्यापाऱ्यांना मासीक विवरणपत्र भरण्यास सांगण्यात यावे असे नमुद आहे. तसेच शासन परिपत्रक क्र. ईसीए-१०१०/४९५/प्र.क्र.९४/ना.पु.२३ दिनांक २० मे, २०१० अन्वये केंद्र शासनाने तांदुळ, धान, डाळी, खाद्यतेल व खाद्यतेलबिया यांच्या साठामर्यादेवर निर्बंध लागु केले आहेत. सबब, या वस्तुंच्या व्यापार व साठवणुक करण्याकरीता संबंधित अनुज्ञप्ती प्राधिकाऱ्याकडून परवाना घेणे आवश्यक आहे. या वस्तुंच्या आयातदारांना साठामर्यादेतुन सुट देण्यात आलेली आहे. परंतु खाद्यतेल व खाद्यतेलबिया यांच्या निर्यातदारांना परवाना घेणे आवश्यक आहे. म्हणजेच डाळी/कडधान्य तसेच अन्नधान्य, खाद्यतेल व खाद्यतेलबिया या अनुसुचित वस्तुंचा व्यापार करणारे घाऊक व्यापारी व निर्यातदार यांना सदर अनुसुचित वस्तुंच्या खरेदी,

OFFICE
BAI

साठवणूक व विक्री करीता महाराष्ट्र अनुसुचित वस्तू घाऊक व्यापार अनुज्ञाप्ती आदेश १९९८ अन्वये घाऊक परवाना घेण्याची आवश्यकता आहे.

महाराष्ट्र अनुसुचित वस्तू घाऊक व्यापार अनुज्ञाप्ती आदेश १९९८ अन्वये देण्यात येणाऱ्या घाऊक परवानामधील "अट क्रमांक २(अ) नुसार अनुज्ञप्तधारक उपरोक्त व्यवसाय परवानामधील नमुद जागेत व्यवसाय करण्याबाबत" सुचित केले असुन, अट क्रमांक २(ब) नुसार "अनुज्ञाप्तीधारक ज्याला उपरोक्त धंदा चालवावयाचा आहे. अनुसुचित वस्तुचा परवानामध्ये उल्लेखिलेल्या गोदामांव्यतिरीक्त इतर कोणत्याही ठिकाणी साठवणुक न करण्याबाबत" नमुद आहे. तसेच "अनुज्ञाप्तीधारकाला नमुद केलेल्या ठिकाणाशिवाय इतर ठिकाणी त्याला अनुसुचित वस्तुंचा साठा ठेवण्याची इच्छा असल्यास त्याने त्याबाबत प्रत्यक्ष असे गोदाम कब्जात घेतल्यापासुन ४८ तासात कळविले पाहीजे व अनुज्ञाप्ती, बदल करण्यासाठी, अनुज्ञाप्ती प्राधिकरणाला सादर केली पाहिजे" असे स्पष्ट नमुद केले आहे.

एपीएमसी पोलिस ठाणे येथील तपासी पोलिस अधिकारी तथा सहाय्यक पोलिस निरिक्षक श्री. ए.एन. काटकर यांनी सादर केलेल्या अभिवेदनामध्ये एकंदरीत झालेल्या तपासावरुन यातील अटक आरोपी यांनी आपसात संगणमत करुन त्यांचे मे. हंसराज खिमराज ॲण्ड कंपनीमध्ये ५६,५५,९३०/- रुपये किंमतीचा अन्नधान्य व कडधान्याचा साठा शिधावाटप आस्थापनेचा घाउक संयुक्त परवाना (पीडीएल/एफडीएल) नसताना बेकायदेशिररित्या साठवणूक केला असल्याचे निष्पन्न होत असल्याचे सांगितले. मे. हंसराज खिमराज ॲण्ड कंपनी सोबत साठा मालकांचा साठवणूक करुन ठेवण्याबाबतचा कोणताही करारनामा झालेला नाही. सदर गुन्ह्यात जप्त करण्यात आलेला अन्नधान्य/कडधान्याचा साठा हा व्यापाऱ्यांचा असून त्यांचा सदरचा साठा यातील अटक आरोपी यांनी शिधावाटप आस्थापनेचा घाउक संयुक्त परवाना (पीडीएल/एफडीएल) नसताना बेकायदेशिररित्या साठवणूक केला असल्याचे निष्पन्न झाले असल्याने नमूद धान्याच्या साठ्याबाबत योग्य तो आदेश होणेस विनंती असल्याचे नमुद केले आहे.

मे. हंसराज खिमराज ॲण्ड कंपनीचे मालक मुकेश करमसिंग देढीया यांनी सुनावणीच्यावेळी केलेल्या खुलाशात, साठा मालकांची यादी सोबत जोडण्यात आली असून त्यांच्या गोदामातील साठ्यापैकी तांदळाचा साठा हा नगन्य परिमाणात आहे. तसेच काबुली चणा हा निर्यातीकरिता व हिरवे वटाणा हा आयात असल्याचे सांगुन त्यांचे गोदाम सिलमुक्त करण्यात यावे जेणेकरुन सदरचा नाशवंत असलेला साठा खराब होणार नाही असे सांगुन त्यांच्या गोदामात होणाऱ्या क्लिनिंग व प्रोसेसिंगच्या प्रक्रियेकरिता परवानगी देण्यात यावी असे सांगितले.

प्रस्तुत प्रकरणी, मे. हंसराज खिमराज ॲण्ड कंपनीचे मालक हे त्यांच्या गोदामात करीत असलेल्या क्लिनिंग व प्रोसेसिंगच्या व्यवसायाकरिता त्यांना महाराष्ट्र अनुसुचित वस्तू घाऊक व्यापार अनुज्ञाप्ती आदेश १९९८ चे कलम २

(क्यु) व (यु) अन्वये मिलर परवाना घेणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने निवेदनासोबत सादर केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन करता त्यांनी उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांचे कार्यालयात दिनांक १३/०७/२००८ रोजी अन्नधान्य/कडधान्याच्या मिलींगच्या व्यवसायाकरीता नविन मिलर परवानासाठी अर्ज केल्याची छायांकित प्रत सादर केली. तथापी, शासन परिपत्रक क्र. ईसीए-१०१०/४९५/प्र.क्र.९४/ना.पु.२३ दिनांक २० मे, २०१० अन्वये अर्जदाराने अर्ज करतांना तपासणीसुची प्रमाणे सर्व कागदपत्रांची पुर्तता करणे आवश्यक असुन तसे न केल्यास अर्जदाराने या कागदपत्रांची ३० दिवसात पुर्तता करणे आवश्यक असल्याचे नमुद असुन त्यानंतर देखील अर्जदाराने कागदपत्रांची पूर्तता न केल्यास सदर अर्ज निकाली काढांवा अर्थात कागदपत्रांची पुर्तता करणेस दिलेले ३० दिवस ही अंतीम तारीख असेल असे स्पष्ट नमुद केले आहे. मे. हंसराज खिमराज ॲण्ड कंपनीचे मालक यांनी सदरचा आवश्यक असलेला मिलर परवाना प्राप्त न केल्याचे सुनावणीच्यावेळी कबुल केले आहे. तसेच तपासी पोलिस अधिकारी यांच्या तपासांतही निष्पन्न झाले आहे. यावरुन त्यांनी मिलर परवाना मिळण्याकरीता अर्ज करुन फक्त सोपस्कार पुर्ण केल्याचे दिसुन येत असुन त्यांना संदरचा परवाना प्राप्त करुन घेण्याकरीता स्वारस्य नसल्याचे स्पष्ट होत आहे. सबब, मे. हंसराज खिमराज ॲण्ड कंपनीचे मालक यांचा नमुद गोदामावर सुरु असलेला मिलींगचा व्यवसाय हा पुर्णपणे बेकायदेशीर व विनापरवाना असल्याचे सिध्द होत आहे.

मे. जरना ट्रेडिंगचे मालक प्रविण जी. मानक, मे. बॉम्बे सप्लायर्स या कंपनीचे व्यवस्थापक किशोर जेठालाल शाह व मे. जलाराम राईस ट्रेडर्सचे मालक दयालजी कल्याणजी भानुशाली यांनी सुनावणीच्यावेळी केलेल्या खुलाशात, त्यांचा नमूद गोदामात तांदळाचा साठा जप्त असून सदरचा साठा त्यांनी साफसफाईच्या प्रक्रियेसाठी हंसराज खिमराज यांच्या गोदामात पाठविण्यात आल्याचे सांगितले. निवेदनासोबत तीन्ही साठामालकांनी विविध परवानांच्या तसेच साठ्याची खरेदी बिलांच्या छायांकीत प्रतींचे अवलोकन करता मे. जरना ट्रेडिंग यांच्याकडे क्र. ४१फ वा/संयुक्त परवाना/३६३(घा) अन्वये अन्नधान्य व डाळी/कडधान्याच्या व्यवसायाकरीता एफ-२, एपीएमसी मार्केट-२, फेस-२, वाशी, नवी मुंबई या पत्यावर घाऊक परवाना असुन मे. बॉम्बे सप्लायर्स यांच्याकडे क्र. ४१फ वा/संयुक्त परवाना/९१(घा) अन्वये अन्नधान्य व डाळी/कडधान्याच्या व्यवसायाकरीता सी-१३, एपीएमसी मार्केट-२, वाशी, नवी मुंबई या पत्यावर घाऊक परवाना आहे. तसेच मे. जलाराम राईस ट्रेडर्स यांच्याकडे क्र. ४१फ वा/संयुक्त परवाना/७२६(घा) अन्वये अन्नधान्य व डाळी/कडधान्याच्या व्यवसायाकरीता पी-१०, एपीएमसी मार्केट-२, फेस-२, वाशी, नवी मुंबई या पत्यावर घाऊक परवाना असुन सदरच्या तीन्ही आस्थापनांच्या परवानांवर वेगळे गोदामाची नोंद नसल्याचे आढळून येते. अनुज्ञप्तीमधील अटीनुसार "अनुज्ञप्तीधारकाला नमुद केलेल्या ठिकाणाशिवाय इतर ठिकाणी त्याला अनुसुचित वस्तुंचा साठा ठेवण्याची इच्छा असल्यास त्याने त्याबाबत प्रत्यक्ष असे गोदाम कब्जात घेतल्यापासुन ४८ तासात कळविणे बंधनकारक आहे." तथापी, मे. जरना ट्रेडिंग, मे.

बॉम्बे सप्लायर्स व मे. जलाराम राईस ट्रेडर्स या तीन्ही आस्थापनांच्या मालकांनी मे. हंसराज खिमराज यांच्या गोदामात तांदळाचा साठा हा साठवणुकीच्या उद्देशाने ठेवला नसुन तात्पुरत्या स्वरुपात साठयाची पत राखण्यासाठी साफसफाईच्या प्रक्रियेसाठी पाठविण्यात आल्याचे कागदपत्रांवरुन दिसुन येते. सबब, मे. जरना ट्रेडिंग, मे. बॉम्बे सप्लायर्स व मे. जलाराम राईस ट्रेडर्स या तीन्ही वैध परवानाधारकांचा तांदळाचा साठा हा केवळ साफसफाईच्या प्रक्रियेसाठी पाठविण्यात आल्याचे सादर केलेल्या कागदपत्रांवरुन संकृतदर्शनी दिसुन येत असल्याने नमुद तीन्ही परवानाधारकांचा जप्त करण्यात आलेला तांदळाचा संपुर्ण साठा हा बंधपत्र घेऊन त्यांना परत करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

मे. ताज अग्रो कमोडिटीज प्रा.लि. चे संचालक हिम्मत जमुनादास चंद्रा यांनी सुनावणीच्यावेळी केलेल्या खुलाशात, त्यांचा वाटाणा व वाटाणादालचा साठा हा हंसराज खिमजी मिल येथे सफाईसाठी पाठविला असल्याचे सांगुन सफाई झालेला वाटाणाचा साठा हा खरेदीदारास वितरीत केला असल्याचे तसेच उर्वरीत शिल्लक असलेला साठा हा सद्यस्थितीत नमुद गोदामावर शिल्लक असल्याचे सांगुन तो परत मिळाल्यानंतर तात्काळ वितरीत करावयाचा असल्याने तसेच सदर साठा हा आयात असून त्या संबंधी बिल ऑफ एन्ट्री आपल्या कार्यालयात सादर केले असल्याने सदरचा साठा मुक्त करण्याची विनंती केली. आयातदाराने आयात साठ्याबाबतची माहिती तसेच साठवणूकीबाबतची माहिती या कार्यालयास वेळोवेळी सादर करणे अभिप्रेत आहे. त्यानुषंगाने मे. ताज अग्रो कमोडिटीज प्रा.लि. यांनी या प्रकरणी जप्त करण्यात आलेला वाटाणा या कडधान्याचा साठा आयात केल्याचे व नमुद गोदामावर साठवणुक केल्याबाबत या कार्यालयास दिनांक ०३/०७/२०१२ रोजी विवरणपत्र सादर केल्याचे आढळून आले आहे. मे. ताज अग्रो कमोडिटीज प्रा.लि. यांनी आयात संबंधीचे सादर केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता, वाटाणा या कडधान्याचा साठा त्यांनी बिल ऑफ एन्ट्री क्र. ६९९९८१७ दिनांक ०४/०६/२०१२ रोजी १२८७.५५ क्विंटल साठा आयात केल्याचे तसेच त्यापैकी दिनांक ०३/०७/२०१२ रोजी संपुर्ण वाटाणाचा साठा मे. हंसराज खिमजी मिलमध्ये साठवणूक केल्याचे दिसून येत आहे. सबब, मे. ताज अग्रो कमोडिटीज प्रा.लि. यांनी उपरोक्त आयात साठ्याबाबतचे सर्व कायदेशीर कागदपत्रे सादर केले असल्याने तसेच सदरचा साठा हा नजीकच्या कालावधीतला असल्याने मे. ताज अग्रो कमोडिटीज प्रा.लि. यांचा आयात केलेला साठा हा साठेबाजीच्या उद्देशाने साठवणुक केला नसल्याने तो वैध असल्याचे दिसून येते. सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेता जप्त साठ्याच्या मालकाने सादर केलेल्या पुरावादर्शक कागदपत्रावरुन जप्त करण्यात आलेला त्यांचा वाटाणा या कडधान्याचा साठा हा वैध असल्याने शासन परिपत्रकानुसार आयात केलेल्या साठ्याबाबतची माहिती वेळोवेळी न चुकता या कार्यालयास सादर करण्याच्या अटीवर मे. ताज अग्रो कमोडिटीज प्रा.लि. यांचा जप्त करण्यात आलेला

वाटाणा व वाटाणादाल या कडधान्याचा संपुर्ण साठा हा बंधपत्र घेऊन त्यांना परत करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

मे. सिमोसिस इन्टरनॅशनलचे भागीदार अंकुश अरुण अग्रवाल यांनी सुनावणीच्या वेळी केलेल्या खुलाशात, त्यांची कंपनी ही शासनमान्यताप्राप्त निर्यात कंपनी असून ते सदरचा साठा हा पक्षी खाद्य उद्योग असलेल्या कंपन्यांना पुरवठा करावयाचा असून सदर साठा हा सफाई झाल्यानंतर तात्काळ निर्यात करावयाचा असल्याने मुक्त करण्याची विनंती केली आहे.

तथापी, मे. सिमोसिस इन्टरनॅशनल या कंपनीचा मे. हंसराज खिमजी ॲन्ड कंपनीचे गोदामात जप्त करण्यात आलेला साठा हा करडी या खाद्यतेलबियांचा असुन, केंद्र शासनाची अधिसुचना क्र. एस.ओ.२२२७ (अ), दिनांक २७ सप्टेंबर, २०११ अन्वये डाळी/कडधान्य, खाद्यतेल व खाद्यतेलबिया या अनुसुचित वस्तूंवर दिनांक ३०/०९/२०१२ पर्यंत निर्बंध आहेत. तसेच महाराष्ट्र अनुसुचित वस्तू घाऊक व्यापार अनुज्ञाप्ती आदेश १९९८ चे कलम २(X) मधील परिशिष्ट मध्ये अनुक्रमांक ४(ii) वर करडी या खाद्यतेलबियाचा समावेश असल्याने सदर साठयाच्या व्यापाराकरीता परवाना घेणे आवश्यक आहे. तसेच शासन परिपत्रक क्र. ईसीए-१०१०/४९५/प्र.क्र.९४/ ना.पु.२३ दिनांक २० मे, २०१० अन्वये केंद्र शासनाने तांदुळ, धान, डाळी, खाद्यतेल व खाद्यतेलबिया यांच्या साठामर्यादेवर निर्बंध लागु केले आहेत. सबब, या वस्तुंचा व्यापार व साठवणुक करण्याकरीता संबंधित अनुज्ञप्ती प्राधिकाऱ्याकडून परवाना घेणे आवश्यक आहे. या वस्तुंच्या आयातदारांना साठामर्यादेतुन सुट देण्यात आलेली आहे परंतु निर्यातदारांना परवाना घेणे आवश्यक आहे, असे स्पष्ट नमुद आहे. परंतु मे. सिमोसिस इन्टरनॅशनल यांनी सादर केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन करता, त्यांनी खाद्यतेलबियांच्या व्यापारासाठी महाराष्ट्र अनुसुचित वस्तू घाऊक व्यापार अनुज्ञाप्ती आदेश १९९८ अन्वये परवाना घेतला नसल्याचे दिसुन येत आहे. मे. सिमोसिस इन्टरनॅशनल या कंपनीने खाद्यतेलबियाचा साठा हा विनापरवाना खरेदी करुन अवैध साठवणूक केली असल्याने त्यांनी महाराष्ट्र अनुसुचित वस्तू घाऊक व्यापार अनुज्ञाप्ती आदेश १९९८ तसेच पर्यायाने जीवनावश्यक वस्तु कायदा, १९५५ च्या तरतुदींचा भंग केला असल्याचे निष्पन्न झाले आहे. सबब, मे. सिमोसिस इन्टरनॅशनल या कंपनीचा जप्त करण्यात आलेला करडी या खाद्यतेलबियाचा संपूर्ण साठा हा शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

मे. संघार एक्सपोर्टस कंपनीच्या वतीने व्यवस्थापक वैभव विजय किर्पेकर यांनी सुनावणीवेळी केलेल्या खुलाशात, त्यांचा काबुली चणाचा साठा हा हंसराज खिमती दालमिल येथे जप्त करण्यात आल्याचे सांगुन सदर काबुली चणाच्या साठ्याचे ते नियमितपणे निर्यात करीत आहेत. सदरचा जप्त करण्यात आलेला साठा त्यांनी गुंटूर जिल्ह्यातील विविध पुरवठादारांकडून सफाई न केलेल्या स्थितीत घेतला असल्याचे सांगून त्या साठ्यापैकीच जप्त असलेला साठा हा निर्यात करावयाचा असल्याने तो सफाईकरिता हंसराज खिमजी मिल येथे पाठविण्यात आल्याचे

सांगितले. तथापी, मे. संघार एक्सपोर्टस यांनी सादर केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन करता त्यांनी जिल्हा गुंतुर, आंध्रप्रदेश या राज्यातील विविध व्यापाऱ्यांकडून माहे मे २०१२ या महिन्यात मोठया प्रमाणावर खरेदी केलेल्या बेंगॉल ग्राम्सच्या साठयाचे खरेदी बिलांच्या छायांकित प्रती सादर केल्या आहेत. सदरहु खरेदी बिलांवर बेंगॉल ग्राम्स असा स्पष्ट उल्लेख असुन त्या बिलांवर कोठेही काबुली चणा अथवा इंडियन काबुली चणा असा उल्लेख दिसुन येत नाही. Chickpea च्या व्याख्येमध्ये There are two main kinds of chickpea: Desi, which has small, darker seeds and a rough coat, cultivated mostly in the Indian subcontinent. Kabuli, which has lighter coloured, larger seeds and a smoother coat, mainly grown in Suthern Europe, Northern Africa, Afghanisthan, Pakistan and Chile. The Desi (meaning "country" or "local" in Hindi) is also known as Bengal Gram or Kala Chana, असे नमुद आहे. शासन आदेश क्रमांक ईसीए-१००९/१६४०/प्र.क्र.५००/ना.पु.२३ दिनांक १९ मार्च, २०१० अन्वये पारीत केलेल्या महाराष्ट्र डाळी, खाद्यतेलबिया आणि खाद्यतेल (साठा निर्बंध) आदेश (द्वितीय सुधारणा) आदेश, २०१० नुसार काबुली चणा वगळण्यात आले आहे. तसेच केंद्र शासनाच्या निर्यात धोरणानुसार काबुली चणा वगळुन इतर सर्व कडधान्यांच्या निर्यातीवर निर्बंध आहेत. मे. संघार एक्सपोर्टस या कंपनीने सादर केलेल्या खरेदी बिलांसोबत ते यापूर्वी पाकिस्तान या देशात निर्यात केलेल्या इंडियन काबुली चिकपीसच्या निर्यातसंबंधी कागदपत्रांच्या छायांकित प्रती सादर केले असुन त्याअन्वये सदर कंपनीने यापूर्वी इंडियन काबुली चणा नियमितपणे निर्यात केल्याचे दिसुन येते. परंतु नमुद गोदामावर जप्त करण्यात आलेला साठा हा चणा असल्याबाबत घटनास्थळी उपस्थित इसमांनी दिलेल्या जबाबात सांगितले आहे. मे. संघार एक्सपोर्टस ही कंपनी सदरचा जप्त चणा या कडधान्याचा साठा हा काबुली चणा असल्याचे भासवुन या कार्यालयाची पर्यायाने शासनाची दिशाभुल करण्याचा प्रयत्न करीत आहे. शासन परिपत्रक क्र. ईसीए-१०१०/४९५/प्र.क्र.९४/ना.पु.२३ दिनांक २० मे, २०१० अन्वये केंद्र शासनाने तांदुळ, धान, डाळी, खाद्यतेल व खाद्यतेलबिया यांच्या साठामर्यादेवर निर्बंध लागु केले आहेत. सबब, या वस्तुंचा व्यापार व साठवणुक करण्याकरीता संबंधित अनुज्ञप्ती प्राधिकाऱ्याकडून परवाना घेणे आवश्यक आहे. या वस्तुंच्या आयातदारांना साठामर्यादेतुन सुट देण्यात आलेली आहे. परंतु निर्यातदारांना परवाना घेणे आवश्यक आहे असे नमुद आहे. मे. संघार एक्सपोर्टस यांनी सादर केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन करता त्यांनी स्थानिक बाजारपेठेतुन खरेदी केलेला चणा या कडधान्याच्या व्यापारासाठी परवाना घेतला नसल्याचे दिसुन येत आहे. मे. संघार एक्सपोर्टस या कंपनीने कडधान्याचा साठा हा विनापरवाना खरेदी करुन अवैध साठवणूक केली असल्याचे सिध्द झाल्याने, त्यांनी महाराष्ट्र अनुसुचित वस्तू घाऊक व्यापार अनुज्ञाप्ती आदेश १९९८ तसेच पर्यायाने जीवनावश्यक वस्तु कायदा, १९५५ च्या तरतुदींचा भंग केला असल्याचे निष्पन्न झाले आहे. सबब, मे. संघार

एक्सपोर्टस या कंपनीचा जप्त करण्यात आलेला चणा या कडधान्याचा संपूर्ण साठा हा शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई, मला जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६-अ नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये ए.पी.एम.सी. पोलिस ठाणे, नवी मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. ३०६०/२०१२ दिनांक २२/०७/२०१२ मध्ये जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात खालील आदेश देत आहे.

**<u>आदेश</u> :-**

१) प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला मे. जरना ट्रेडिंग यांचा ९२५ बाचक्यांमधील २१७.७५ क्विंटल तांदळाचा संपूर्ण साठा हा बंधपत्र घेऊन त्यांना परत करण्यात यावा.

२) प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला मे. बॉम्बे सप्लायर्स यांचा ६० बाचक्यांमधील १५.०० क्विंटल तांदळाचा संपूर्ण साठा हा बंधपत्र घेऊन त्यांना परत करण्यात यावा.

३) प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला मे. जलाराम राईस ट्रेडर्स यांचा ३२२ बाचक्यांमधील ८०.५० क्विंटल तांदळाचा संपूर्ण साठा हा बंधपत्र घेऊन त्यांना परत करण्यात यावा.

४) प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला मे. ताज अग्रो कमोडिटीज प्रा.लि. यांचा ६० बाचक्यांमधील २७.७५ क्विंटल वाटाणा व ११ बाचक्यांमधील ५.५० क्विंटल वाटाणा डाळ या कडधान्याचा संपूर्ण साठा हा बंधपत्र घेऊन त्यांना परत करण्यात यावा.

५) प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला मे. सिमोसिस इन्टरनॅशनल यांचा २६४ बाचक्यांमधील ७९.२० क्विंटल करडी या खाद्यतेलबियाचा संपूर्ण साठा शासनजमा करण्यात यावा.

६) प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला मे. संघार एक्पोर्टस यांचा ६०६ बाचक्यांमधील १५१.५० क्विंटल चणा या कडधान्याचा संपूर्ण साठा शासनजमा करण्यात यावा.

७) सदर शासनजमा करण्यात आलेला संपूर्ण करडी या खाद्यतेलबियाचा व चणा या कडधान्याचा साठा पोलिसांनी, उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांच्या मदतीने वैध परवानाधारकास प्रचलित दराने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

DIRECTOR OF CIVIL SUPPL
OFFICE

वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालाची पोलिसांनी विल्हेवाट लावून येणारी रक्कम पोलीसांनी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई (Financial Advisor & Dy. Secretary, Food,

Civil Supply & Consumer Protection Dept., Govt. of Maharashtra, Mumbai) यांचे कार्यालयाच्या वैयक्तिक ठेव लेख्यात "४४०८" या लेखाशिर्षात जमा करावी.

सही/-
नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,

१) मे. हंसराज खिमराज ॲण्ड कंपनीचे मालक मुकेश करमसिंग देठीया
२) मे. जरना ट्रेडिंगचे मालक
३) मे. बॉम्बे सप्लायर्सचे मालक
४) मे. जलाराम राईस ट्रेडर्सचे मालक
५) मे. सिमोसिस इन्टरनॅशनलचे मालक
६) मे. ताज अग्रो कमोडिटीज प्रा.लि. चे मालक
७) मे. संघार एक्सपोर्टचे मालक

(वरिष्ठ पोलीस निरीक्षक, एपीएमसी पोलिस ठाणे, नवी मुंबई यांचे मार्फत)

प्रत,

१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, ए.पी.एम.सी. पोलिस ठाणे, नवी मुंबई यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करुन पूर्तता अहवाल सात दिवसात या कार्यालयास सादर करावा.
२) उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.
३) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषित.
४) कार्यासन अधिकारी, दक्षता शाखा, का.क्र. ५, प्रधान कार्यालय, मुंबई यांना माहितीस्तव.
~~५)~~ निवड नस्ती.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
HEAD OFFICE
MUMBAI

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.